# सोलापूर महानगरपालिका
## सभेचा इतिवृत्तांत
## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ)
## उप-समिती बैठक क्रमांक -४२

महानगरपालिका, जा.क्र.नआ/वै/९११ मा.आयुक्त कार्यालय दि. ११.०३.२०२२ रोजीच्या मा.प्रशासकसो यांच्या आदेशाने मा.अति.आयुक्त, मा.मुख्यलेखापरिक्षक, नगरसचिव व विषयाशी संबंधित विभागाचे खातेप्रमुख/सहा.आयुक्त, यांची उप-समिती गठीत करणेत आली आहे. सदर प्रस्तावा बाबत प्रशासकीय दप्तरी ठराव करणेकामी मा.उपसमितीचे शिफारसी करिता दि.१९.०८.२०२२ रोजी बैठक क्रमांक ४१ संपले नंतर मा.अति.आयुक्त यांचे कार्यालय येथे बैठक बोलाविणेत आली होती.

सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क. | अधिकारी/ कर्मचारी | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा.श्री.विजय खोराटे | अतिरिक्त आयुक्त |
| २ | मा.सौ.रुपाली कोळी | मुख्यलेखापरिक्षक |
| ३ | मा.श्री.प्रविण दंतकाळे | नगरसचिव |
| ४ | मा.श्री मच्छींद्र घोलप | उपायुक्त |
| ५ | मा.सौ.पुष्पगंधा भगत | सहा.आयुक्त सा.प्र.वि. |
| ६ | मा.श्री.संदिप कारंजे | नगर अभियंता |

| अ.क्र | विषय क्रमांक | विषयाचा तपशील | संबंधित खातेप्रमुख / सहा.आयुक्त | मा.प्रशासक यांचेकडे विषया संबंधी निर्णय घेणे कामी उपसमितीची शिफारस |
|---|---|---|---|---|
| १ | ८७ | १५व्या वित्त आयोग अंतर्गत मुलभूत अनुदान हिस्सा विनियोग करणेकामी मुख्यलेखापाल यांचेकडून आलेले प्रकरणास शहर अभियंता यांनी प्रस्तावित केले प्रमाणे मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.५१० दि.१७/०२/२०२२ बाबत प्रशासकिय दृष्टीकोनातून फेर निर्णय होणेकामी आलेले प्रकरणाचे अवलोकन केले योजनेसाठी महापालिका हिस्सा भरणेकामी मान्यता देण्यात येत आहे.<br>तसेच स्मार्ट सिटीसाठी भरावयाची महापालिका हिश्श्याची रक्कम हे जस जसे १५ व्या वित्त आयोग अंतर्गत मुलभूत अनुदान हिश्श्याची रक्कम उपलब्ध होईल. त्यानुसार टप्या - टप्पयाने रक्कम वर्ग करणेस सदरचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणे आवश्यक आहे परंतू मा.सर्वसाधारण अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे मान्यतेस्तव पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि:१०/०८/२०२२ चे मान्यतेने आलेले प्रकरण. | मुख्यलेखापाल | मान्यता देण्यात येत आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | ८८ | सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्राचा सन २०२१-२२ करीताचा पर्यावरण सध्यस्थिती अहवाल (ESR) प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे विभाग प्रमुख पर्यावरण विभाग, पु.आहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ यांनी सन २०२१-२२ करीता (ESR) अहवाल सादर करणेकामी कार्यादेश देण्यात आलेल्या या कार्यादेशाप्रमाणे दि.३०/०७/२०२२ रोजी (ESR) सन २०२१-२२ करीताचा अहवाल प्राप्त झालेला असून सदर अहवाल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ अ अन्वये व दि.०४/०६/२०१० चे मा.शासन निर्णयातील प्राप्त निर्देशानुसार सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्राचा सन २०२१-२२ करीताचा पर्यावरण सध्यस्थिती अहवाल (ESR) तयार करून मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणे आवश्यक असल्याने तथापी आजला मा.सर्वसाधारण अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे अहवालाचे अवलोकन होऊन मान्यतेस्तव पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.१२/०८/२०२२ चे मान्यतेने आलेले प्रकरण. **(ई-१४७०४) AMC -4** | सहा.आयुक्त | **मान्यता देण्यात येत आहे.** |
| ३ | ८९ | श्री.अरुण नागनाथ सोनटक्के, विधान सल्लागार यांचे विभागीय चौकशीबाबत श्री.सोनटक्के यांचे ए.सी.बी.प्रकरणी व १७४ प्रलंबित प्रकरणी विभागीय चौकशी मध्ये तो दोषी असल्याचे निष्पन्न झालेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ५६ मधील तरतुदीस अनुसरून शास्ती बाबत शिफारस होण्यास सादर, तसेच मा.आयुक्त यांचेकडून सुचविण्यात आलेली शास्तीस सदर पदाची नियुक्ती प्राधिकारी म्हणून मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे परंतू मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **मान्यतेस्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.१९/०८/२०२२ चे मान्यतेने आलेले प्रकरण **(ई-९२१८) GAD** | सहा.आयुक्त | **प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे श्री.सोनटक्के यांचेविरूध्द करण्यात आलेले चार्जेस हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे असून सदरचे चार्जेस त्यांचेविरुध्द केलेल्या विभागीय चौकशीत शाबित झाले असल्याचे चौकशी अधिकारी यांनी त्यांचे चौकशी अहवालात नमूद केले आहे, मा.आयुक्त यांनी दि.१९/०८/२०२२ च्या शिफारसी प्रमाणे करावयाच्या कार्यवाहीसाठी आवश्यक असणाऱ्या कायदेशीर बाबीची** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | पूर्तता करून म्हणजे प्रथम श्री.सोनटक्के यांना वरील कारणांसाठी सेवासमाप्त का करू नये अशी नोटीस देऊन ४ दिवसात खुलासा करणे बाबत कळवावे, या नोटीसीसोबत चौकशी अधिकाऱ्यांने सादर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत ही श्री.सोनटक्के यांना देण्यात यावी. श्री.सोनटक्के यांचा खुलासा मुदतीत न आल्यास, अगर सदरचा खुलासा समाधानकारक नसलेस त्यांच्याविरुध्द शास्तीसंदर्भात अंतिम निर्णयासाठी मा.सर्वसाधारण सभेकडे सादर करण्यात यावे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने मा.प्रशासक यांचेकडे मान्यतेस्तव पाठविणेस नमूद प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. |

मा. नगर अभियंता
सोलापूर महानगरपालिका

मा. सहा.आयुक्त ,सा.प्र.वि.
सोलापूर महानगरपालिका

मा. उपायुक्त
सोलापूर महानगरपालिका

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

मा.मुख्यलेखापरिक्षक
सोलापूर महानगरपालिका

मा.अति.आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

## सोलापूर महानगरपालिका
## प्रशासक ठराव
## विषय क्र.८७ ठराव क्र.८७ दिनांक. १९/०८/२०२२
## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )



१५व्या वित्त आयोग अंतर्गत मुलभूत अनुदान हिस्सा विनियोग करणेकामी मुख्यलेखापाल यांचेकडून आलेले प्रकरणास शहर अभियंता यांनी प्रस्तावित केले प्रमाणे मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.५१० दि.१७/०२/२०२२ बाबत प्रशासकिय दृष्टीकोनातून फेर निर्णय होणेकामी आलेले प्रकरणाचे अवलोकन केले योजनेसाठी महापालिका हिस्सा भरणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

तसेच स्मार्ट सिटीसाठी भरावयाची महापालिका हिश्श्याची रक्कम हे जस जसे १५ व्या वित्त आयोग अंतर्गत मुलभूत अनुदान हिश्श्याची रक्कम उपलब्ध होईल. त्यानुसार टप्प्या - टप्पयाने रक्कम वर्ग करणेस **मान्यता देण्यात** येत आहे.

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

# सोलापूर महानगरपालिका

## प्रशासक ठराव

### विषय क्र.८८ ठराव क्र.८८ दिनांक. १९/०८/२०२२

### (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )

८८

सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्राचा सन २०२१-२२ करीताचा पर्यावरण सध्यस्थिती अहवाल (ESR) प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे विभाग प्रमुख पर्यावरण विभाग, पु.आहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ यांनी सन २०२१-२२ करीता (ESR) अहवाल सादर करणेकामी कार्यादेश देण्यात आलेल्या या कार्यादेशाप्रमाणे दि.३०/०७/२०२२ रोजी (ESR) सन २०२१-२२ करीताचा अहवाल प्राप्त झालेला असून सदर अहवाल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ क अन्वये व दि.०४/०६/२०१० चे मा.शासन निर्णयातील प्राप्त निर्देशानुसार सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्राचा सन २०२१-२२ करीताचा पर्यावरण सध्यस्थिती अहवाल (ESR) तयार करून मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणे आवश्यक असल्याने तथापी आजला मा.सर्वसाधारण अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे अहवालाचे अवलोकन होऊन मान्यतेस्तव पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.१२/०८/२०२२ चे मान्यतेने आलेले **प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका
प्रशासक ठराव
विषय क्र.८९ ठराव क्र.८९ दिनांक. १९/०८/२०२२
(मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )

८९

श्री.अरुण नागनाथ सोनटक्के, विधान सल्लागार यांचे विभागीय चौकशीबाबत श्री.सोनटक्के यांचे ए.सी.बी.प्रकरणी व १७४ प्रलंबित प्रकरणी विभागीय चौकशी मध्ये तो दोषी असल्याचे निष्पन्न झालेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ५६ मधील तरतुदीस अनुसरून शास्ती बाबत शिफारस होण्यास सादर, तसेच मा.आयुक्त यांचेकडून सुचविण्यात आलेली शास्तीस सदर पदाची नियुक्ती प्राधिकारी म्हणून मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे परंतू मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **मान्यतेस्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.१९/०८/२०२२ चे मान्यतेने आलेले प्रकरण **प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे श्री.सोनटक्के यांचेविरूध्द करण्यात आलेले चार्जेस हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे असून सदरचे चार्जेस त्यांचेविरुध्द केलेल्या विभागीय चौकशीत शाबित झाले असल्याचे चौकशी अधिकारी यांनी त्यांचे चौकशी अहवालात नमूद केले आहे, मा.आयुक्त यांनी दि.१९/०८/२०२२ च्या शिफारसी प्रमाणे करावयाच्या कार्यवाहीसाठी आवश्यक असणाऱ्या कायदेशीर बाबीची पूर्तता करून म्हणजे प्रथम श्री.सोनटक्के यांना वरील कारणांसाठी सेवासमाप्त का करू नये अशी नोटीस देऊन ४ दिवसात खुलासा करणे बाबत कळवावे, या नोटीसीसोबत चौकशी अधिकाऱ्यांने सादर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत ही श्री.सोनटक्के यांना देण्यात यावी. श्री.सोनटक्के यांचा खुलासा मुदतीत न आल्यास अगर सदरचा खुलासा समाधानकारक नसलेस त्यांच्याविरुध्द शास्तीसंदर्भात अंतिम निर्णयासाठी मा.सर्वसाधारण सभेकडे सादर करण्यात यावे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने मा.प्रशासक यांचेकडे** मान्यतेस्तव पाठविणेस नमूद प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका